महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड

श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, जिल्हा क्रीडा संकुल, नांदेड ४३१ ६०५

दुरध्वनी क्रं.०२४६२-२३५६२३ ई मेल पत्ता – dsonanded@rediffmail.com, dsonanded2462@gmail.com

जा.क्र.जिक्रीअ/युप्रशिणकेंद्र/शिबीर/आयोजना/२०१७-१८/ दि.२३.०३.२०१८

प्रति,
मा.प्राचार्य/ मुख्याध्यापक/ मुख्याध्यापीका, तालुका क्रीडा संयोजक,

---------------------------------------------

---------------------------------------------

**विषय** :-युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना योजनेतंर्गत योजना १० दिवसाच्या प्रशिक्षण शिबीराकरीता उपस्थित राहणेबाबत.. दिं.२८ मार्च,२०१८ ते ०८ एप्रिल,२०१८

**संदर्भ** :-संचालनालयाचे पत्र क्रं.युकयो/युवाप्रशिक्षणकेंद्र/१७-१८/का-१० दिं.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, जिल्हा क्रीडा संकुल, श्री गुरुगोबिंदसिंधजी स्टेडीयम परीसर, गोकूळनगर, नांदेड येथे दिं.२८ मार्च,२०१८ ते ०८ एप्रिल,२०१८ या कालावधीत युवकांच्या सक्षमीकरणाकरीता विविध विषयावरल १० दिवसाच्या प्रशिक्षण शिबीर आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणाकरीता आपल्या तालूक्यातील ५ युवक व ५ युवती किंवा जास्तीत जास्त १५ युवक/ युवतींची नांवे अंतिम करुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड येथे तात्काळ dsonanded@rediffmail.com या मेलवर व सॉप्टकॉपी पाठवून कळविण्यात यावे.

सदर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने युवकांच्या सक्षमीकरणासाठी विविध विषयावरील १० दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये विविध तज्ञ व्यक्तिच्या मदतीने मार्गदर्शन देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण शिबीरासाठी १५ ते २२ व २३ ते २९ या वयोगटातील युवकांना विविध जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी २२ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या व नेहरु युवा केंद्राकडे नेहरु युवा कर्मी, राष्ट्रीय सेवा योजनेचे २ कॅम्प पुर्ण केलेले विद्यार्थी युवक युवती, राष्ट्रीय छात्रसेनेचे विद्यार्थी युवक युवती, एम.एस.डब्ल्यू, एम.ए.सायकॉलॉजी, एम.ए.सोशियालॉजी इत्यादी शिक्षण घेत असलेले युवक युवती, स्वयंसेवी संस्था, नोंदणीकृत युवा व महिला मंडळे इत्यादीकडून सामाजिक कार्यात रस घेणारे व आवड असणारे युवक युवती यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून नांदेड जिल्हयातील वरील पात्रता धारण करणा-या युवकांना शिबीरासाठी पाचारण करण्यात येत आहे.

सदर जिल्हास्तर प्रशिक्षण शिबीराकरीता आपल्या शाळा/ महाविद्यालय/ तालुक्यातील युवक व युवतींना उपस्थित राहण्याकरीता कळविण्यात यावे. तसेच आपल्यास्तरावर प्रशिक्षणार्थी यांना योग्य त्या आवश्यक सूचना देण्यात याव्यात. तसेच त्यांच्यासोबत खालील नमून्यात माहिती भरुन पाठविण्यात यावी.

| अ.क्रं. | नांव | जन्मदिनांक | पत्ता | मोबाईल | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

प्रशिक्षण शिबीराची रुपरेखा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण शिबीराचा कालावधी | दि.२८ मार्च,२०१८ ते ०४ एप्रिल,२०१८ |
| २ | उपस्थिती | दि.२८ मार्च,२०१८ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| ३ | प्रशिक्षण शिबीराचे स्थळ | जिल्हा क्रीडा संकुल, बहुउद्देशिय इनडोअर हॉल,स्टेडीयम परीसर,नांदेड |
| ४ | प्रशिक्षण शिबीराकरीता संपर्क | क्रीडा अधिकारी श्री.एम.जे.सोनकांबळे-९८८१०७१७७०,<br>श्री.सय्यद साजीद- ९४२३४५२६९८, श्री.प्रवीण कोंडेकर-७०५८८४२३८४ |
| ५ | **सुचना** :- १.निवास राहण्याच्या तयारीने सर्व दैनंदिन आवश्यक साहित्य बरोबर आणणे. २.कोणतीही मौल्यवान वस्तू सोबत बाळगू नये ३.सोबत क्रीडा गणवेश (ट्रॅक सुट, टि शर्ट, शॉर्ट, स्पोर्टस शुज) तसेच शिटी, स्टॉप वॉच, नोटबुक इत्यादी आवश्यक साहित्य बरोबर आणावे. | |

आपला विश्वासु

जिल्हा क्रीडा अधिकारी,नांदेड

प्रत माहितीस्तव सविनय सादर,